नि.दि..दा.क्र. ६७/२०१९
कुंदा वि. नितीन
**नि.क. १४**

**<u>साक्षीदाराचा पुढील सरतपास वादतर्फे त्यांचे वकील श्री. मानकर यांद्वारे शपथेवर सुरु</u>**.

आता मला माझे शपथपत्र नि.१४ दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरचा मजकुर माझे वकीलांनी मला माझे मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगितला व तो माझे मते बरोबर आहे.

आता मला दस्त यादी क्र.१८ मधील दस्त क्रमांक १ दाखविण्यात आला. सदरचे दस्त हे प्रतिवादी यांनी वादीला दिलेले हमीपत्र आहे. (सदरच्या कागदपत्राला प्रतिवादीच्या वकीलांनी सदरचे दस्त हे नोंदणीकृत नसल्यामुळे त्याला निशानी देण्यास हरकत घेतली. वादीच्या वकीलांनी सदरचे दस्त हे प्रतिवादीने लिहुन दिल्याचे सांगितले सदर दस्तावर वादी, प्रतिवादी व इतर साक्षीदारांच्या सहया आहेत. सदरच्या दस्ताला ओळखीसाठी निशानी देण्यात येत आहे.) सदरचे दस्त **<u>निशानी २०-अ</u>** वर आहे.

आता मला दस्त यादी क्र. ४ मधील दस्त क.४ दाखविण्यात आला. सदरचे दस्त हे माझे वकीलांनी माझे सहीनिशी दिनांक २६/०४/२०१९ रोजी प्रतिवादीला दिलेली नोटीसची प्रत आहे. सदरची नोटीस ही सहप्रत असल्यामुळे त्याला **<u>नि.क.२१</u>** देण्यात येत आहे. आता मला दस्त क्र.५ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे पोष्टाच्या दोन पावती आहे. त्याला **<u>नि.क.२२</u>** देण्यात येते. आता मला दस्त क्र. ६ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे पोहच आहे. त्यास **<u>नि.क.२३</u>** देण्यात येते. आता मला दस्त क्र.७ दाखविण्यात आले.

सदरचे दस्त हा बंद लिफाफा आहे. सदर दस्ताला **नि.क.२४** देण्यात येते. आता बंद लिफाफा कोर्टासमक्ष उघडुन त्यामधील नोटीस ही साक्षीदारास दाखविण्यात आली. सदर नोटीस ही दिनांक २६/०४/२०१९ रोजी पाठविलेल्या नोटीसची मुळ प्रत आहे. सदर नोटीस ही मुळ प्रत असल्याने त्याला **नि.क.२५** देण्यात येते.

**उलटतपास प्रतिवादी करीता त्यांचे सुविद्य वकील श्री.पी. पी.यादव याद्वारे**-

प्रतिवादीचे वकील यांनी केलेल्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

सह.दि.न्या.क.स्तर,
कामठी.
दिनांक १४/०९/२०२१

(एस.एस.गाडवे)
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कोर्ट नं.२, कामठी.